आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता

२ जून २०२४ - रविवार

लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या मंगळवारी ४ जून रोजी होणार असून त्या दृष्टीनं राज्यात सर्वत्र प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे.

लातूर लोकसभा मतदार संघात मतं मोजणीसाठी २८ फेऱ्या असतील तर टपाली मतदानासाठी एक फेरी असणार आहे. सांगली लोकसभा मतदारसंघातली मतमोजणी मिरजेतल्या वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन इथे होणार आहे. मतमोजणीसाठी प्रशासनामार्फत सर्व तयारी करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातल्या माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज आहे. मतमोजणी विधानसभा मतदारसंघानुसार २० ते २५ फेऱ्यांमध्ये होईल. लोकसभा निवडणुकीच्या निकालांच्या ताज्या बातम्या देण्यासाठी निवडणूक विशेष बातमीपत्रं आणि निकालांचं विश्लेषण करणारा चर्चात्मक कार्यक्रम **निवाडा जनतेचा** आकाशवाणीवर सादर होणार आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात काल ६२ पूर्णांक ३६ शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली. सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ मतदारसंघामध्ये मतदान झालं.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रीया काल संपल्यानंतर विविध वृत्तसंस्था आणि अन्य संस्थांनी एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर कल चाचणीचे आकडे प्रसिद्ध केले आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी, लोकसभा निवडणुकीत सत्ता टिकवून ठेवणार असल्याचं, बहुतांश अंदाजांमध्ये दिसून येत आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळाल्यास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करता येईल.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता

२ जून २०२४ - रविवार

<><><><>

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक खाजगी वृत्तवाहिन्यांनी वर्तवलेले निकालांचे अंदाज काँग्रेसनं नाकारले असून हे अंदाज बोगस असल्याचं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, यांनी आज पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक घेतली. दूरस्थ पद्धतीने झालेल्या या बैठकीत पक्षाचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल, ज्येष्ठ नेते राहुल गांधी, तसंच निवडणूक लढवणारे सर्व उमेदवार आणि प्रदेश काँग्रेस समित्यांचे अध्यक्ष सहभागी झाले होते.

<><><><>

सिक्किम विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी सिक्किम क्रांतीकारी मोर्चाला पूर्ण बहुमत मिळालं आहे. सिक्किमधल्या ३२ पैकी ३१ जागांवर सिक्किम क्रांतीकारी मोर्चाने विजय मिळवला आहे. तर सिक्किम डेमोक्रॅटिक फ्रंटच्या वाट्याला एक जागा आली आहे.

तसंच अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. ६० जागांपैकी ४६ जागांवर भाजपानं विजय मिळवला आहे. नॅशनल पीपल्स पार्टीने पाच जागा जिंकल्या असून राष्ट्रवादी काँग्रेसने ३, काँग्रेसने एक, पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचलनं २ जागा जिंकल्या आहेत. तर ३ अपक्ष उमेदवारांनी या निवडणुकीत विजय मिळवला आहे.

<><><><>

वस्तू आणि सेवा कराचं एकूण संकलनात यावर्षीच्या मे महिन्यात १ लाख ७३ हजार कोटी रुपये झाल्याचं अर्थ मंत्रालयानं सांगितलं आहे. या संकलनात दहा टक्के वार्षिक वाढ झाली आहे. यापैकी केंद्रीय वस्तू आणि सेवा कर संकलन ३२

हजार कोटी रुपये, राज्य वस्तू आणि सेवा कर संकलन ४० हजार कोटी, आणि एकत्रित संकलन ८७ हजार ७८१ कोटींहून अधिक आहे.

<><><><><>

मध्य रेल्वेच्या ठाणे स्थानकात फलाट रुंदीकरणाचं काम झालं असून छत्रपती शिवाजी टर्मिनस वरची कामंही आटोपत आली आहेत. मेगाब्लॉकनंतर मुंबई सीएसटी हून आज पहिली उपनगरी गाडी रवाना झाली.

<><><><><>

नांदेड शहराजवळच्या वाडी बुद्रुक या गावात एका नाल्याजवळ गंजलेल्या स्थितीतल्या ४३७ बंदुकीच्या गोळ्या सापडल्या. याबाबत गावकऱ्यांकडून माहिती मिळाल्यानंतर, स्थानिक भाग्यनगर पोलिसांसह, दहशतवाद विरोधी पथक आणि पोलिसांच्या श्वानपथकानंही घटनास्थळी पोहचून तपास सुरू केला. या प्रकरणाचा सखोल तपास करून, गोळ्यांचा माग काढू असं पोलीस अधीक्षकांनी बातमीदारांना सांगितलं.

<><><><><>

खरीप हंगामासाठी कृषी विभागानं सिंधुदुर्ग जिल्ह्यात  चालू वर्षात ७० हजार हेक्टर जमिनीवर शेती क्षेत्राचं उद्दिष्ट ठेवलं आहे.  त्यापैकी  ६३ हजार हेक्टर क्षेत्रात भात पिकाचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.  पंधराशे हेक्टर क्षेत्रात नागली तसंच कुळीथ, मूग, उडीद, भुईमूग आणि तीळ या पिकांचं उद्दिष्ट असल्याची माहिती कृषी विभागातून देण्यात आली. बीज निर्मितीची प्रक्रिया शेतकऱ्यांना समजावी यासाठी जिल्ह्यात गावोगावी शेती शाळांचं आयोजनही करण्यात येणार आहे.

//<><><><><>//